ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

# सामाजिक परिवर्तनाचा अनुबंधः आंबेडकरी रंगभूमी

डॉ. गायकवाड बाळू भागवत

म. जोतीराव फुले, छ. राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी आणि कृतिशील विचारातून निर्माण झालेली साहित्यकृती सामाजिक परिवर्तनाची तथा प्रबोधनाची उर्जस्वलता ठरली आहे. आंबेडकरी विचाराच्या विश्वात साहित्य कथा, कविता, कादंबरी, आत्मकथा, पथनाट्य, एकांकिका, नाटक, समीक्षा व वैचारिक लेखनाला मोलाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यातल्या त्यात नाट्यरंगभूमीने सामाजिक सौहार्द निर्माण केले असल्याचे या रंगभूमीने सिद्ध केले आहे. म्हणूनच फुले आंबेडकरी नाट्यसृष्टीला परिवर्तननिष्ठ रंगभूमी म्हणून जगात स्थान आहे. याचे विशेष कारण म्हणजे या रंगभूमीने प्रस्थापित व्यवस्थेला नाकारुन परिणामी त्या व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारुन समाजव्यवस्थेत सामाजिक समता वृद्धींगत करणारी विचारसरणी म्हणजेच प्रबोधन-परिवर्तनाकडे वाटचाल करणारी एक सशक्त धारणा रुजविण्याचं कार्य या रंगभूमीनं केलं असल्याचं दिसून येते.

ऐतिहासिक औरंगाबाद शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मिलिंद' महाविद्यालयाच्या रुपाने शिक्षणरुपी ज्ञानदानाचा वटवृक्ष उभा केला. याच महाविद्यालयाच्या प्रांगणात 'दलित रंगभूमी'ची पायाभरणी झाली. 'युगयात्रा' या प्राचार्य म.भि. चिटणीसांनी १९५५ साली साकारलेल्या नाट्यकृतीचे साक्षीदार खुद्द डॉ. बाबासाहेब असल्याने या लेखन कृतीला एक वैशिष्ट्य प्राप्त झाले. आपला प्रतिपाद्य विषय समाजाला साध्या सोप्या भाषेत समजावून सांगण्याचे एकमात्र माध्यम म्हणजे नाटक होय. म्हणूनच साङ्गोत्तरी वाङ्मयीन प्रवाहात आंबेडकरी विचारसरणीच्या साहित्य कृतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.फुले-आंबेडकरी विचाराच्या साााहित्यात प्रकट होणारी परिवर्तनाची जी संकल्पना आहे. तिच्या आधारे आपण अन्य साहित्य प्रवाहांशी या रंगभूमीचे नाते स्पष्ट करु शकतो. या नाट्य रंगभूमीत एकूणच मानवी जीवनातील ताण-तणाव, सुखदुःखाचे भलेबुरे अनुभव, छळ, माणसाच्या वेदना, त्यांचा विद्रोह, भूक, दारिद्र्य, गरिबी लाचारी या साऱ्या भावना कलाकारांच्या आविष्कारातून नाट्यसृष्टीच्या रंगपीङ्गावर साकार होतात. त्याच वेळी मानवी जीवन आणि नाटक यातील नातेसंबंध रसिक श्रोत्यांच्या अनुभवास येतात. फुले आंबेडकरी नाट्यकृतीतून मानवी जीवनाचे त्याच्या अस्तित्त्वाचे या विश्वाशी आंतरीक नाते आहे. हे सहजपणे जाणवते. असे मानवाचे नातेसंबंध संपूर्ण समाज जीवनाला जोडण्याचे काम नाटक ही कलाकृती करते असे आपणास दिसून येईल.

विशेषतः लोकरंगभूमीची लोकनाट्य परंपरा ही आधुनिक रंगभूमीची जन्मदात्री म्हणून सिद्ध झाली आहे. यक्षगान, ललित, गोंधळ, भारुड, कीर्तन, तमाशा, वगनाट्य, शाहिरी, लावणी, पथनाट्य, जलसे, दंडार, कङ्गपुतळ्या आदी लोककला ह्या आजच्या रंगभूमीला जन्म देणाऱ्या कला असल्याचे मान्य करावे लागते. या संदर्भात डॉ. ईश्वर नंदपूरे म्हणतात, "मानवी मनोरंजनाचा प्रयत्न लोककलांनीच केला आणि एक सांस्कृतिक उन्नयन करण्याचे कामही लोककालीन केले. ज्यात 'नाट्य' मोङ्ग्या प्रमाणात असते. असे नाट्य असलेली लोककला दलित समाजात जन्माला

आली आणि दलित समाजानेच ती जोपासली, तिचे संवर्धन केले. 'बामनाघरी लिवनं, अन म्हाराघरी गाणं' ही म्हणही त्याच अर्थानं रुढ झाली."[1]

आपल्या जीवनात व जगण्यात आपल्याला आलेले दाहक अनुभव त्याचे प्रतिबिंब नाट्यकृतीत उमटत असते. म.फुले यांचे 'तृतीयरत्न' १८५५, उमाबाबा आवळजकर, यांचे 'मोहना बटाव', किसन फागो वनसोडे 'संत चोखामेळा', 'सत्यशोधक जलसे' हरिभाऊ तोरणे, 'चोखामेळ्याची पंढरपूर स्वारी', प्रतितपापनदास यांचे 'भारत भाग्योदय', भीमराव कर्डक यांचे 'नाशिकचा धर्म संग्राम' त्याशिवाय आंबेडकरी जलसे हे दलित रंगभूमी अर्थात आंबेडकरी नाट्यसृष्टीचे आद्यरुप म्हणून पुढे आले होते. फुले आंबेडकरी रंगभूमीत कथावस्तुसह एखादी समस्या असते त्या संदर्भात प्रा. अविनाश डोळस म्हणतात की, "दलित नाटक हे प्रामुख्याने आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेल्या जीवन विषयक आकलनाचा कलाविष्कार आहे. हा कलाविष्कार विचारांचा, दृष्टीकोनाचा एक भाग आहे. या सर्व कलाविष्काराच्या मूळाशी भ. बुद्धांनी सांगितलेल्या मानवतेबद्दलची आतीव करुणा होय."[२] म्हणजेच दलित नाटकात दलित बहुजन उपेक्षित वर्गाच्या जीवनसंबंधीचे प्रश्न मांडले जातात. बुद्ध, फुले, आंबेडकरवादी विचारसरणी यात प्रकर्षाने मांडलेली असते· या नाटकात दलित जाणीव, नाट्यलेखकाचा स्वानुभव सामाजिक स्थिती आदी चित्रण प्रस्तुत नाट्यकृतीतून केल्याचे स्पष्ट होते- या संदर्भात डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, "दलित साहित्याने विज्ञानवादी दृष्टी पहिल्यांदाच साहित्यातून प्रतिबिंबित केली आहे· आता तर 'दलित' साहित्य हा शब्द जगभर गेला आहे. ही संज्ञा कधीच जातीवादी नव्हती, तशी भूमिका एकाही साहित्य निर्मात्याने घेतली नाही. प्रत्ययकारी नवे जग निर्माण करणाऱ्या नव्या माणसांचे साहित्य म्हणून ते ओळखले जाऊ लागले. मनुष्याला कलंकित करणाऱ्या सर्व विचारांचा व्यक्तीचा आणि संस्थाचा यात निषेध केला."[३]

**समारोप :**

डॉ. आंबेडकरांचा समतेचा लढा हा अनेक शोषित पिडितांसाठीचा होता. ज्यांचे शोषण होते त्यांच्यासाठी 'गुलाम' शब्द बाबासाहेब वापरतात. तेव्हाच या गुलामीच्या मुक्तीचा मंत्रघोष ते करतात. एकूणच आंबेडकरी नाटकातून दलितत्वाचा शोध घेऊन परिवर्तन प्रबोधनासाठी नाटककारांनी विषयाची वस्तुनिष्ठपणे मांडणी केलेली आहे आणि म्हणून दलित नाटकाला परिवर्तननिष्ठ रंगभूमीचे महाद्वार म्हटले गेले आहे. कारण 'वास्तव' आणि 'विस्तव' यांच्या अनुभवाचा पुनः प्रत्यय यातून रसिक श्रोत्यांना मिळत गेला आहे.त्यामुळेच या कलाकतीला एक सौष्ठव प्राप्त झाले आहे·

**संदर्भ :**

१) नंदपूरे (डॉ.) ईश्वर - साहित्य : ग्रामीण आणि दलित, (सं.) विजय प्रकाशन, नागपूर, पृ. २७५.
२) प्रा. डोळस अविनाश - कित्ता, पृ. २७९.
३) डॉ. पानतावणे गंगाधर - डॉ. कुलकर्णी मदन (गौरवग्रंथ) सं. ईश्वर नंदपुरे, प्र.आ. २००२, पृ. २७८.

**डॉ. गायकवाड बाळू भागवत**

मराठी विभाग, मौलाना आझाद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद.